Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

November -2020

SPECIAL ISSUE NO - CCLX (260)

## INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor:
Dr.R.M.Hajari
Principal
Sham Gadale Art's Collage,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

Editor:
Dr.S.N.Jadhavar
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's Collage,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Scanned with OKEN Scanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 265 (CCXLIII)
ISSN : 2278-9308 November, 2020

# महाराष्ट्रातील दलित चळवळ : डॉ.बी.आर.आंबेडकर पूर्व कालखंड

शरद बाबुराव सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री जि. धुळे

## प्रस्तावना

दलित हा शब्द साधारणत: शोषित घटकांसाठी किंवा वर्गासाठी पर्यायवाचक असून त्याचा विशिष्ट जातींशी मुळीच संबंध नाही. मात्र, आधुनिक काळात 'दलित' हा शब्द जातीशी जोडला जात असल्याचे दिसते. पूर्वीच्या काळी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींचा अंतर्भाव दलित या संकल्पनेत वर्तमान काळात केला जातो. म्हणून सामाजिक परिवर्तनाचे इतिहासाचे अवलोकन करत असतांना 'दलित' ही संकल्पना समजुन घेणे गरजेचे ठरते. प्रस्तुत शोधनिबंधात 'दलित' या शब्दाचे वेगवेगळे अर्थ आणि त्याच्या व्याप्तीची उकल करून दलित संकल्पनेचे असे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व काळातील महाराष्ट्रातील दलित चळवळीच्या प्रारंभिक प्रयत्नांचा आढावा घेतला आहे.

## दलित : संकल्पनेचे आशय विश्लेषण

दलित समाज हा मागासलेला समाज–समूह आहे. हजारो वर्षापासून या समाज–समूहावर अन्याय–अत्याचार होत आलेले आहेत. छळ–कपट, दास्य, दैन्य या आयुधांच्याद्वारे या समाज–समूहावर सतत आसूड ओढले गेले आहेत.[१] हिंदू जाती व्यवस्थेमध्ये त्यांना अवर्ण म्हटले जाते, म्हणजेच त्यांची जागा चातुर्वर्ण व्यवस्थेच्या बाहेर आहे, त्यांना पेरियल पंचम, अतिशूद्र, अंत्यज किंवा नामशूद्र असेही देशाच्या विविध भागात म्हटले जाते. त्यांचा स्पर्श आणि काहीवेळा त्यांची सावली, एवढेच काय त्यांचा आवाज सुद्धा जातिवंत हिंदूंना दूषित करतो, असे मानले जाते. कायद्याने जरी आता त्यांना अस्पृश्य मानले जात नसले तरी अजूनही व्यवहारात कित्येक जणांना हा कलंक सहन करावा लागतो.[२]

वैदिक वाङमयात चांडाळ, निषाद हे शब्द आढळतात. पण त्यात त्यांच्या अस्पृश्यतेबद्दल स्पष्ट उल्लेख आढळत नाही. स्मृतिकाळ व धर्मशास्त्रयुगात धार्मिक शुद्धता व पवित्र–अपवित्रता या कल्पना प्रखर झाल्याचे दिसून येते. डॉ. घुर्ये म्हणतात त्याप्रमाणे धार्मिक पवित्र–अपवित्रतेची कल्पना इ.स.पू.८०० वर्षापूर्वी स्पष्टपणे अस्तित्वात आल्याच्या खुणा सापडतात. मनुस्मृतीच्या काळात अस्पृश्यतेच्या भावनेला कढ आला व त्यानंतर अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींवर अत्याचार–कांड सुरू झाले. त्यांना कित्येक हजार वर्षे अत्याचार निमुटपणे सहन करावे लागले. म्हणूनच आर्य समाजाने या जातींना यथार्थपणे 'दलित' असे संबोधले. ज्या लोकांना कोणतेच अधिकार दिले गेले नव्हते व जे लोक दाबून ठेवले गेले होते ते दलित.[३]

दलित हा शब्द नवीन नाही. १९३० च्या सुमारास हा शब्द हिंदीत आणि मराठीत वापरला गेला. इंग्रजांनी ज्यांना 'पिडलेला/नाडलेला वर्ग' म्हटले, त्यांनाच आता 'अनुसूचित जाती' असे म्हटले जाते. १९३० मध्ये पुण्यातून या पिडलेल्या वर्गासाठी 'दलितांचे मित्र' (दलित मित्र) म्हणून एक वर्तमानपत्र निघत असे. हाच शब्द बी. आर. आंबेडकर त्यांच्या मराठी भाषणातही वापरत असत.[४] म्हणजेच, १९३१ च्या जनगणनेपूर्वीपासून 'दलित' हा शब्द प्रचारात होता. पण १९३१ च्या जनगणना अधिकाऱ्याने (जे. एच. हटन) या जातींचा उल्लेख 'बाह्य जाती' असा करून हिंदू समाजापासून या जाती वेगळ्या आहेत असे सूचित केले. याच्याआधारावर मॅक डोनाल्ड या ब्रिटिश पंतप्रधानाने दलित जातींना स्वतंत्र निर्वाचन क्षेत्र (मतदार संघ) देण्याचे जाहीरही केले. पण महात्मा



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule
Scanned with OKEN Scanner

गांधींनी २० सप्टेंबर १९३२ रोजी आमरण उपोषण सुरू केल्यामुळे त्यांचे स्वतंत्र निर्वाचन क्षेत्र रद्द केले गेले व या जाती हिंदू समाजातील आहेत ही वस्तुस्थिती मान्य करण्यात आली. १९३५ च्या कायद्यात त्यांना अनुसूचित म्हणून संबोधण्यात आले व त्यांना विशेष सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या."[4] तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, "दलित हा मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला व मागे रेटलेला सामाजिक वर्ग आहे."[5] याप्रकारे 'दलित' या संज्ञेला अनेक पैलू असुन विविध दृष्टिकोनातून या संज्ञेचा अर्थ काढला जातो.

डॉ.आंबेडकर पूर्व काळातील महाराष्ट्रातील दलित चळवळ

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या अगोदर दलित चळवळ हे नाव न वापरता, मानवमुक्तीची ही चळवळ भारतात सर्वप्रथम महात्मा फुले यांनी सुरू केली. महात्मा फुले यांच्यानंतर या चळवळीचे महत्त्वाचे कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन'च्या माध्यमातून केले. महाराष्ट्र राज्यातील दलित वर्गाला जागृत करण्याचे कार्य गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे आणि किसन फागुजी बनसोडे यांनी केले. १८८६ मध्ये ब्रिटिश लष्करातून निवृत्त झाल्यावर गोपाळबाबा वलंगकर यांनी दापोली येथे 'अनार्य दोष परिहार' नावाची संस्था स्थापन करून त्याद्वारे दलित समाजाला जागृत करण्याचे कार्य केले... तर पुणे येथे शिवराम जानबा कांबळे यांनी दलित समाजाला जागविण्याचे कार्य केले. त्यांनी दलितांमधील पोतराज, देवदासी यासारख्या अनिष्ट चालीरीती नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. 'सोमवंशीय मित्र' नावाचे मासिक त्यांनी काही काळ चालून दलितांच्या आचार विचारात सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केले. तसेच त्यांनी १९२९ साली झालेल्या पर्वती मंदिर सत्याग्रहाचे नेतृत्व केले होते. विदर्भात किसन फागुजी बनसोडे यांनी दलित मुलांसाठी शाळा, वसतिगृहे सुरू केली. त्यांनी आपल्या लेखनाद्वारे आणि सामाजिक प्रश्नांवर परिषदा भरवून दलित समाजाला जागृत करण्याचे व त्यांच्यामध्ये स्वाभिमान निर्माण करण्याचे काय केले. याशिवाय अनेक सुधारक व दलित कार्यकर्त्यांनी दलितांमध्ये जागृती करून स्वाभिमान निर्माण करण्यासाठी काम केले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा दलित चळवळीची धुरा आपल्या खांद्यावर घेतली, तेव्हापासून दलित चळवळीला खरे चैतन्य प्राप्त होऊन दिशा मिळाली.

निष्कर्ष

अनेक अभ्यासक, विचारवंत व समाजसुधारकांनी दलित या संज्ञेला वेगवेगळ्या दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र 'दलित' हा शब्द सामान्यपणे पिढ्यनपिढ्या ज्यांचे शोषण झाले आहे, अशा शोषित, उपेक्षित व वंचित घटकांसाठी वापरला जाणारा शब्द असून त्यामध्ये महिलांचा देखील समावेश होतो. परंपरागत भारतीय समाज व्यवस्थेत आणि जातीव्यवस्थेमध्ये ज्या जातींना हीन लेखले जाऊन त्यांचे शोषण केले गेले, त्यांच्यासाठी साधारणपणे 'दलित' हा शब्द वापरला जातो. परंतु अनेक अभ्यासकांचा असा दावा आहे की, दलित ही एक जाणीव असून तिचा संबंध जातीशी नाही तर वर्गाची आहे आणि तो वर्ग शोषित घटकांचा आहे.

महाराष्ट्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलित उद्धारासाठी प्रदीर्घ लढा देऊन कायदा व संविधानाच्या माध्यमातून दलितांच्या उत्कर्षासाठी बहुमोल योगदान दिले. मात्र त्यांच्या पूर्वीदेखील महाराष्ट्रात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे अशा समाजसुधारकांनी दलित उद्धारासाठी प्रयत्न केले आहे. याबरोबरच गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे व किसन फागुजी बनसोडे या दलित समाजातील कार्यकर्त्यांनी देखील दलितांमध्ये जनजागृती करण्यासाठी मोलाचे योगदान दिलेले आहे. दलित चळवळीला पुढे डॉ.आंबेडकरांचे खंबीर नेतृत्व लाभल्यामुळे दलित मुक्तीचा लढा हा मानवमुक्तीचा लढा बनला. मात्र हे आंबेडकर पर्व सुरू होण्यापूर्वी आधीच्या



Scanned with OKEN Scanner

समाजसुधारकांनी व कार्यकर्त्यांनी दलित चळवळीची पायाभरणी केलेली असल्यामुळे त्यांचे योगदान नाकारता येत नाही.

संदर्भ सूची

१. पगारे म.सू., 'दलित साहित्याचा इतिहास', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००५, पृ.१३
२. शहा घनश्याम (अनु. प्राची चिकटे), 'भारतातील सामाजिक चळवळी', डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २०११, पृ.९४
३. नाडगोंडे गुरुनाथ, 'सामाजिक आंदोलने', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६, पृ.४०,४१
४. जॉन सी.बी.वेबस्टर, 'दलित म्हणजे कोण?': एस.एम.मायकेल (संपा.) (अनु. विद्या भाके), 'आधुनिक भारतातील दलित', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २०११, पृ.५६
५. उपरोक्त, नाडगोंडे गुरुनाथ, 'सामाजिक आंदोलने', पृ.४१
६. कित्ता
७. पाटील बी.बी., 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१०, पृ. २९२,२९३

T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Scanned with OKEN Scanner